कापुरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९६ /२०२६ दि. २४/०४/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, कापूरबावडी वाहतूक उपविभागचे हद्दीत श्री साईबाबा ट्रस्ट तर्फे श्री साईबाबा मंदिराचा २६ वा वर्धापन दिन दिनांक २८/०४/२०२६ रोजी ते दिनाक ०२/०५/२०२६ रोजी पावेतो साजरा करण्यात येणार असुन, वर्धापन दिन सोहळया निमित्त विविध सास्कृतिक कार्यक्रम तसेच भडाऱ्याचे आयोजन केलेले आहे. त्यामुळे सदर ठिकाणी दर्शनाकरिता येणारे भाविकांची गर्दी मोठया प्रमाणात होत असते. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश **बंद** –	१) साकेत कडुन बाळकुम मार्गे कशेळीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना साकेत **महालक्ष्मी मंदिर** समोर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही महालक्ष्मी मंदिर येथुन डावीकडे वळण घेवुन रुस्तमजी समोरील कट मधुन बाहेर पडुन नाशिक मुबई महामार्गावरुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश **बंद** –	२) कशेळी कडुन बाळकुम मार्गे साकेतकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी **मार्ग** –	सदरची वाहने ही सरळ पुढे जावुन कापुरबावडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश **बंद** –	३) लोढा कट येथुन बाहेर पडुन बाळकुम मार्गे कशेळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना लोढा **कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही लोढा कट येथुन उजवे बाजुस वळण घेवुन साकेत महालक्ष्मी मंदिर येथुन इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २८/०४/२०२६ रोजी ते दि. ०२/०५/२०२५ रोजी पर्यंत सायंकाळी १६:०० वा. ते रात्रौ २४:०० वा. पावेतो अमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.